**प्रा.डॉ.भगवान वाघमारे**
M.Sc., Ph.D. FPSI. FBSI



प्रा.डॉ. भगवान वाघमारे एक चिंतनशील व्यक्तिमत्व. सत्यशोधनाची आणि सत्य वर्तनाची नाळ घेऊन जगणारे. यांचा पिंड हा चींतेवर काथ्याकूट न करता सातत्याने चिंता वाहण्याचे काम करणारा आहे. एक चिकित्सक, अभ्यासू. मुळात सामाजिक बांधिलकी मानणारे, स्वतःला सामाजिक चळवळीचे अपत्य समजणारे आणि विवेक जपणारे ते वैचारिक डॉक्टर आहेत. भगवान वाघमारे हे मुळातच विज्ञान या विद्याशाखेचे संशोधक, चिकित्सक, मार्गदर्शक असले तरी, त्यांचा पिंड परिवर्तनवादी सामाजिक चळवळीतील कार्यकर्ता, कवी - लेखक, संशोधक, समीक्षक आणि व्याख्याते विचारवंत म्हणून त्यांचा महाराष्ट्रात दबदबा आहेच. विज्ञान विद्याशाखेचे अंतर्गत वनस्पतीशास्त्र या विषयात त्यांनी स्वतःला झोकून देऊन आपली आपल्या विषयातील गुणवत्ता सिद्ध केली आहे. त्याच प्रमाणे परिवर्तनवादी सामाजिक चळवळीतील एक आदर्श म्हणून त्यांचे विचार- विवेक त्याग- समर्पण, दानत, वैचारिक समजुतदारपणा आणि strong academic and social commitment ही त्यांची माणूस म्हणून माणसांच्या मोठेपणाची खूण आहे. ही त्यांच्या चाळीस वर्षाच्या चळवळीतील अस्तित्वाची जाणंही आहे.

''समाजाचे देणे म्हणजे आमचे जगणे'' मानणारी संघटना म्हणजे क्रांतिवीर लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघ अर्थत ''लसाकम'' अस्मितेच्या शोधाची.

परंपरेच्या नकाराची, विषमता विरोधी विद्रोहाची, समता-स्वातंत्र्याच्या मूल्याची, चळवळ ''लसाकम'' या कर्मचाऱ्याच्या सामाजिक संघटनेच्या माध्यमातून गेल्या ३२ वर्षापासून क्रांतिवीर लहुजी, क्रांतिबा फुले, राजर्षी शाहू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि सत्यशोधकी अण्णाभाऊची विचारधारा घेऊन ''लसाकम'' एक अराजकीय चळवळ म्हणून आज परिवर्तनवादी तत्त्वज्ञानाच्या वैचारिक अधिष्ठानावर महाराष्ट्रात जोमाने वाढते आहे. विषम समाजव्यवस्था बदलून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यावर आधारित समताधिष्ठित समाज व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न म्हणजे शोषणमुक्त समाज व्यवस्था निर्माण करण्याचे स्वप्न घेऊन वाढते आहे.

शिस्त! सेवा!! त्याग!!! हे लसाकमचे ब्रिद आणि क्रांतिवीर लहुजी, क्रांतिबा फुले, राजर्षी शाहू, डॉ.बाबासाहेब - सत्यशोधकी अण्णाभाऊंची विचारधारा हीच लसाकम ची अर्थात आमची निष्ठा आणि प्रेरणा होय. समग्र परिवर्तनासाठी लढणाऱ्या संघटनेचे प्राध्यापक डॉक्टर भगवान वाघमारे हे कृतीशील शिलेदार कालही होते आणि आजही आहेत. चळवळी आणि समाजाने विश्वासाने टाकलेली जबाबदारी आपण समाजाचे ''Brain'' अर्थात ''मेंदू'' म्हणून स्वीकारावे. आपल्या सतत काम करण्याच्या निष्ठेतून अमुलाग्र बदलाची ''लसाकम'' ही परिवर्तनवादी चळवळ वाढावी. एक नवा ''आयाम'' निर्माण व्हावा त्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. परिवर्तनवादी आणि रचनात्मक कार्याला गतिमान करण्यासाठी वाचन, मननं आणि चिंतन करावेचं लागते यावरचं त्यांचा विश्वास आहे. म्हणून डॉक्टर भगवान वाघमारे हे वाचन, मनन, चिंतन आणि त्यातून नवनिर्मिती करणारे विचारवंत कार्यकर्ते म्हणून त्यांची महाराष्ट्रात ओळख आहे.

Dayadhan Publishers Group
263, Anudaya, Akola Road, Near Gram Panchayat Office,
Balsond, Hingoli Maharashtra State (India)
7276193979
www.dayadhanpublication.com

ISBN : 978-81-951061-0-3



# फकिराचे तत्वज्ञान



प्रा.डॉ.भगवान वाघमारे

# फकिराचे तत्त्वज्ञान


## प्रा. डॉ. भगवान वाघमारे

**निलंगा, जिल्हा लातूर.**

**माजी प्रदेशाध्यक्ष, लसाकम, महाराष्ट्र राज्य.**

**दयाधन पब्लिशर्स ग्रुप, भारत सरकारच्या MSME मंत्रालया अंतर्गत मान्यताप्राप्त.**
**नोंदणी क्रमांक MH-12-0001884**

# फकिराचे तत्त्वज्ञान

## © प्रा. डॉ. भगवान वाघमारे

**आवृत्ती** :- पहिली

**प्रकाशक**

मस्के अनिता दयाराम

दयाधन पब्लिशर्स ग्रुप, 263, 'अनुदया', अकोला रोड, ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, बळसोंड, हिंगोली.

महाराष्ट्र राज्य, ( भारत) 431513.

Mob. No. 7276193979 / 9604872233

**Email Id**: - dayadhanpublishersgroup@gmail.com

**Website:** - http://www.dayadhanpublication.com

**मुद्रक**

श्रेया प्रिंटर्स, 263, 'अनुदया', अकोला रोड, ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, बळसोंड, हिंगोली.

महाराष्ट्र राज्य, ( भारत) 431513.

**प्रकाशन दिनांक 11/04/2021**

**ISBN 978-81-951061-0-3**

किंमत 45/-

**टीप:-**

प्रस्तुत ग्रंथातील लेखन व पुनर्मुद्रण यांचे सर्व हक्क प्रोफेसर भगवान वाघमारे यांच्याकडे राखीव आहेत. लेखन संभ्रमित अथवा सदोष झाल्यास / आढळल्यास यासाठी केवळ लेखकच जबाबदार असतील. ग्रंथातील भाषा, लेखन आणि आशय याविषयी प्रकाशक किंवा मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

**न्यायाधिकरण:-**

जिल्हा व सत्र न्यायालय, हिंगोली.

# अर्पण पत्रिका

**सत्यशोधकी**

**व**

**सत्यवर्तनी**

**विचार परंपरेला**

**सस्नेह....!**

# माझा आतला आवाज

मी विद्यार्थी दशेपासूनच परिवर्तनवादी सामाजिक चळवळीच्या सानिध्यात राहिलेलो आहे. विविध कार्यक्रम आणि उपक्रमात स्वतःहोऊन सहभाग नोंदविलेला आहे. वेगवेगळ्या कार्यक्रमात सतरंज्या अंथरण्यापासून ते कार्यक्रमाची जुळवाजुळव करणे हे सामाजिक कार्यकर्त्यांचे कर्तव्य म्हणून सातत्याने कामात राहिलो आहे. त्यातूनच परिवर्तनवादी सामाजिक चळवळीतील रस्त्यावरचा कार्यकर्ता म्हणून  माझी ओळख चळवळीमध्ये निर्माण झालेली आहे. विविध व्याख्याने ऐकणे, मिळेल ते, जमेल तसे वाचणे, त्यातून मनन - चिंतन आणि अनेक जाणकारांशी वैचारिक चर्चेतुन परिवर्तनवादी सामाजिक चळवळीच्या संदर्भाने मूलभूत काही शिकता आले. मोर्चे, निवेदने, उपोषणे - सत्याग्रह आणि व्याख्याने यातूनच सामाजिक चळवळीतील संवेदनशील कार्यकर्ता म्हणून माझा पिंड पोसला गेला. माझी जडण - घडणच सामाजिक चळवळीत कार्यकर्ता म्हणून झाली असल्याने माझ्यात सामाजिक बांधिलकीचे भान निर्माण झाले. चळवळीतील रस्त्यावरचा कार्यकर्ता म्हणून माझ्या कामाची सुरुवात महाराष्ट्र युवक परिषद, दलित पॅंथर, शिष्यवृत्ती वाढ संघर्ष समिती आणि आजतागायत क्रांतिवीर लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघ अर्थात लसाकम या परिवर्तनवादी कर्मचाऱ्यांच्या सामाजिक संघटनेचा अविभाज्य भाग म्हणून जगतो आहे. विद्यार्थीदशेत अनेक प्राध्यापकांशी, चळवळीतील स्वयंपूर्ण आणि डोळस

कार्यकर्त्यांशी माझा सहवास वाढला त्यातून ऐकणे, वाचणे, चर्चा करणे, मोडके तोडके लिहिणे आणि भाषणे देणे हे माझ्याकडून सताततत्याने घडत गेले. मी आठवी - नववी पासून लिहीत असताना सुद्धा दुर्दैवाने माझे विचार पुस्तकाच्या रूपाने बाहेर आलेले नाहीत पण अनेक व्याख्यानांच्या निमित्ताने ते चिंतनीय राहिलेले आहेत, त्याचा मीच साक्षीदार आहे. आपण नक्कीच काय करतो? आणि काय बोलतो? हे स्वतःला अधिक कळते हे मी जाणतो!

अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे मूल्य जपणारे साहित्य आहे. मानवी समूहाला आवश्यक असणाऱ्या मूलभूत गरजा अर्थात स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय ही मूल्य मानवाप्रति प्राधान्याने प्रदान करतात. अण्णाभाऊंचा फकिरा तर मूल्यांचा पोशिंदाच आहे. बुद्ध, बश्वेश्वर, शिवराय, लहुजी, क्रांतिबा फुले, आंबेडकर, अण्णाभाऊ आणि गाडगे बाबा या तत्वचिंतका पासून सर्वहारा मानवी समूहासाठी निर्माण झालेले मूल्यांचे तत्वज्ञान फकिरा निर्माण तर करतोच आणि ते ही न्यायाने प्रदानही करतो. अण्णाभाऊंचा फकिरा शूर आहे. वीर आहे. क्रांतिकारक आहे. त्याला दानत्वाची जोड आहे. या अन्वयार्थाने मानवी मूल्य जतन करणाऱ्या फकिरा या झंझावाताचे चिंतन करणे क्रमप्राप्त ठरते, म्हणूनच हा खटाटोप.

मित्रांनो, अण्णाभाऊंची कादंबरी वाचणे एक खरी गोष्ट, पण अण्णाभाऊंची कादंबरी अभ्यासणे तिचे आकलन करणे आणि त्यातील मानवी मूल्यांचे जतन आणि रक्षण करणाऱ्या बारिक - सारिक अर्थात लहान - लहान गोष्टी समजून - उमजून घेऊन, त्याचे extraction करणे आणि

उद्याच्या नवसमाज निर्मितीसाठी मांडणे म्हणजे अण्णाभाऊंच्या समग्र लेखन कृतीला न्याय मिळवून देणे होय, असे मी मानतो. अण्णाभाऊंचे समग्र साहित्य शोध आणि संशोधनाच्या अंगाने अभ्यासला पाहिजे. तरच परिपूर्ण अण्णाभाऊ आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाला गवसणी घालता येते. त्यांच्या वैचारिक तत्त्वज्ञानाचा अविभाज्य भाग म्हणून फकिराकडे पाहावे लागेल असे वाटते.

ही तत्वज्ञानाची मांडणी जग जाहीर व्हावी म्हणून अनेक दिवसापासून अनेक मित्र तुमची जी मांडणी आहे ते ग्रंथ रूपात प्रकाशित करा! असा अनेकदा अनेकांचा अट्टाहास राहिलेला आहे. पण मी मात्र त्याकडे अतिशय दुर्लक्ष केले. कविता आणि अनेक वैचारिक लेख पाक्षिक, मासिक, त्रैमासिक अशा प्रासंगिक विशेषांकातून आणि लहुशक्ती, उद्धगार सत्यशोधकी जागर, विमुक्त , गिरीकंदरातून अशा गौरव ग्रंथातून आणि वृत्तपत्रातून प्रकाशित झालेली आहेत. पण मला, माझे विचार पुस्तकाच्या माध्यमातून प्रकाशित करता आले नाहीत हा माझा गुन्हा! परिवर्तनवादी चळवळीच्या अनुषंगाने मी अण्णाभाऊ साठे यांच्या तत्त्वज्ञानावर अनेकदा भाष्य केलेले आहे. माझी जी संशोधन वृत्तीतून निर्माण झालेली मांडणी आहे ती ग्रंथरूपात येणे हे मला आवश्यक वाटल्याने, **फकिराचे तत्वज्ञान** ही छोटेखानी पुस्तिका आपल्या समोर येते आहे याचा मला प्रचंड मनस्वी आनंद आहे.

खरे तर, अण्णाभाऊंच्या साहित्यातील तत्वज्ञान हा विषय घेऊन परभणी येथे लसाकमच्या वतीने आयोजित साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती व्याख्यानात ‘अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील तत्त्वज्ञान’ या विषयाच्या अनुषंगाने माझी मांडणी झाली त्यानंतर माझे साहित्य

चळवळीतील मित्र प्रा. डॉ. इंद्रजीत भालेराव यांनी भगवानराव! हे तुमचे तत्वज्ञान ग्रंथ रूपात येणे आवश्यक आहे असा सूचक सल्ला दिला असतानाही मला त्यादरम्यान हे शक्य झाले नव्हते.

अण्णाभाऊ साठे यांचे तत्वज्ञान हे पुस्तक रुपाने यावे असे महाराष्ट्र युवक परिषदेतील माझे चळवळीतील साथीदार सतीश कावडे, डॉ. राजेंद्र गोणारकर नांदेड, प्रोफेसर डॉ. बी. एस. वाघमारे नवी दिल्ली, डॉ.राजकुमार मस्के, उदगीर, प्राचार्य माधव गादेकर सर, लातूर. प्रा. संजय गायकवाड, डॉ. दिगंबर नेटके, डॉ. ऋषिकेश कांबळे, डॉ. अशोक चव्हाण औरंगाबाद, डॉ. सुरेंद्र शिंदे, प्राचार्य आनंद भंडारे, किनवट., स्मृतिशेष कॉ. विठ्ठल मोरे, डॉ. व्यंकट कसबे, मा.बालाजी साळुंके, मा. उत्तम मिसाळ, मा.केशव शेकापुरकर, लातूर, डॉ. रमेश लांडगे, बीड., डॉ. मारुती कसाब, उदगीर, धनराज सूर्यवंशी चाकूर इत्यादींच्या आग्रह आणि पाठपुराव्यामुळे या लेखन उपक्रमास अधिक गती आणि बळकटी प्राप्त झाली. हे विशद करताना मला मनस्वी आनंद होत आहे.

सौ. अनिता दयाराम मस्के हिंगोली यांनी त्यांच्या मालकीच्या दयाधन पब्लिशर्स ग्रुप या प्रकाशन संस्थेतून अण्णाभाऊ साठे यांचे तत्त्वज्ञान प्रकाशित करण्याचा माझा पिच्छाच सोडला नाही. डॉ. दयाराम मस्के, कार्यकारी संचालक, दयाधन पब्लिशर्स ग्रुप, हिंगोली या दाम्पत्याने निरंतर संपर्क ठेवून माझ्याकडून लेखन कार्य पूर्ण करून घेतले त्यामुळे त्यांचा नामोल्लेख करणे मला आवश्यक वाटते. त्यातीलच एक भाग म्हणून फकिराचे तत्वज्ञान हे माझे

चिंतन छोटेखानी पुस्तिकेच्या माध्यमातून प्रकाशित होत आहे. मी विज्ञानाचा प्राध्यापक, चळवळीतला कार्यकर्ता आणि साहित्याचा वाचक म्हणून जे जे मला दानशूर फकिराच्या माध्यमातून अवगत झाले ते ते मी फकिराचे तत्त्वज्ञान या पुस्तिकेत संदर्भासह मांडलेले आहे. यासाठी लसाकमचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष मा. अण्णासाहेब तोडे यांची संदर्भ पुरवण्यांमध्ये खूप मोठी मदत झाली त्यांचे आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो. त्याच बरोबर प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे (कराड), यांच्याशी झालेली चर्चा ही या पुस्तिकेच्या संदर्भाने महत्वाची आहे म्हणून त्यांचेही आभार मानणे क्रमप्राप्त ठरते. हे लेखन निर्दोष व्हावे यासाठी जबाबदारी आणि खबरदारीने व्याकरणिक सुधारणा करण्यासाठी पुरेसा वेळ देऊन लेखन तपासणी करून देणारे डॉ. महेश मंगनाळे यांचा उल्लेख करणे अनिवार्य आहे. यासोबतच सुनील वांझरवाडे, निलंगा यांनी मुद्रण किमान वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले या कारणाने यांचाही नामोल्लेख आवश्यक ठरतो.

फकिराचे तत्वज्ञान या तात्विक लेखनातील विचार, संदर्भ, आशय आणि विषय हे कुणाला रुचतील, कुणाला पचतील हे मी सांगणे शक्य नाही. जे जे रुचणारं - पचणारं ते ते तुमचेंच, जे जे नाही ते ते माझे. या अपेक्षासह ज्यांनी - ज्यांनी मला अण्णाभाऊंचे तत्वज्ञान हे ग्रंथरूपाने प्रकाशीत व्हावे अशी सूचना केली त्यांचे, माझ्या कुटुंबातील प्रा. शाम वाघमारे, डॉ. उत्तम वाघमारे, प्रा. ज्योतस्ना उत्तम वाघमारे, प्रा. बालाजी गोटेवाड, तसेच ज्यांचा नामोल्लेख केल्याखेरीज या लेखनकलाकृतीस पूर्णत्व प्राप्त होत नाही, जिणे

कौटुंबिक नेतृत्व करत मला माझे समाज भ्रमणाचे दायित्व विनासायास पूर्ण होऊ शकले ती माझी अर्धांगिणी सौ. गोदावरी वाघमारे यांच्या वेळदेऊपणामुळे हे शक्य झाले आहे. हे नमूद करणे मी माझे कर्तव्य समजतो. त्याचबरोबर माझा मुलगा व सूनबाई कुमारसागर – सौ. अश्विनी, या कामात माझी ऊर्जा वाढवणाऱ्या वैष्णवी व साईली आणि सर्व आप्त सदस्यासहित, माझे विद्यार्थी आणि हितचिंतक या सर्वांच्या ऋणात राहणे पसंत करून थांबतो.

**प्रा. डॉ. भगवान वाघमारे**

महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा. जिल्हा लातूर.

माजी प्रदेशाध्यक्ष लसाकम महाराष्ट्र राज्य.

# स्वाभिमानी पोशिंदा फकिरा

लहू, फुले, शाहू, आंबेडकर, अण्णाभाऊ यांच्या विचारांप्रति एकनिष्ठ आणि समग्र असलेले सुप्रसिद्ध विचारवंत आणि पुरोगामी चळवळीचे भाष्यकार प्रोफेसर भगवान वाघमारे सर हे खऱ्या अर्थाने वनस्पतिशास्त्र या विषयाचे वैज्ञानिक म्हणून सुपरिचित असतानाच त्यांच्या आत्तापर्यंतच्या वैचारिक परंपरेला लेखनाकृत करण्याचा मनोदय आम्ही दयाधन पब्लिशर्स ग्रुपच्यावतीने त्यांच्याशी बोलून संकल्पित केला. सरांनी अवघ्या काही क्षणात विचार लेखन परंपरेस सानंद स्वीकृत केले.

अण्णाभाऊ साठे हे विद्रोही, सामाजिक न्यायाचे प्रणेते, जन माणसाचे आत्मभान असणाऱ्या नायकांना प्रेरित आणि लेखांकित करणारे थोर सत्यशोधकी विचारवंत व साहित्यिक आहेत. अण्णाभाऊ साठे त्यांच्या समग्र वांङ्मयातील प्रमुख 'फकीरा' ही एक कादंबरी आहे. या कादंबरीच्या माध्यमातून जोगणीचा ताबा मिळवण्याचा संघर्ष आणि लढा हा केवळ यात्रा अथवा जत्रा महोत्सव इथपर्यंतच मर्यादित न राहता या प्रक्रियेचे वैचारिक आणि प्रबोधकीय चिंतन होणे अत्यावश्यक आहे. फकिरा नायक म्हणून या कादंबरीतील मुख्य केंद्रित असलेले पात्र आहे. या पात्रास तथाकथित मंडळींनी विस्तारित, व्यापक, सामाजिक सलोखा राखणारे न लिहिता ते कलुषित आणि विध्वंसक स्वरूपात  मांडून फकिराच्या कर्तुत्वाचे विडंबन

मांडलेले आहे परंतु फकिरा हा सामाजिक न्यायाचा प्रणेता असलेला, दानत असलेला, जाणता नायक आहे. हे मांडण्याचे प्रमुख काम या लघु पुस्तिकेच्या माध्यमातून आपल्या सर्वांच्या हाती सुपूर्द करताना मला मनस्वी आनंद होत आहे.

सत्यशोधकी व सत्यवर्तनी विचार परंपरेतील बहुआयामी तत्त्वज्ञान प्रोफेसर भगवान वाघमारे सर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून आपणा सर्वांच्या हाती लवकरच स्थिरावणार आहे या अशावादासह आपण सर्व या लघु पुस्तिकेचे मनःपूर्वक स्वागत कराल हीच आशा बाळगतो.

फकिरा हा वंचित, दुर्लक्षित, उपेक्षित, शोषित, श्रमिक, कष्टकरी आणि पोटाची व बोटांची गाठ भेट न होणाऱ्या समूहासाठी स्वाभिमानी पोशिंदा आहे. हे प्रत्येक प्रसंगागणिक वाचकांच्या निदर्शनास आल्याशिवाय राहत नाही. प्रस्तुत लेखनात आदरणीय वाघमारे सरांनी उपस्थित केलेले ऐतिहासिक दाखले, प्रसंग, सामाजिक न्याय, नैतिकता, बंड, विद्रोह, आणि मानवी जाणिवांचे अलौकिक शब्दामृत या पुस्तिकेचे वाचन करताना आपल्या प्रत्ययास आल्याखेरीज राहणार नाही. याचाही त्रिवार विश्वास वाटतो.

क्रांतिकारी अभिवादन

**डॉ. दयाराम द. मस्के**

लसाकम, सभासद नोंदणी प्रमुख, महाराष्ट्र राज्य.

कार्यकारी संचालक, दयाधन पब्लिशर्स ग्रुप, हिंगोली

# फकिराचे तत्त्वज्ञान

सत्यशोधकी अण्णाभाऊ साठे यांच्या जग प्रसिद्ध फकिरा कादंबरीचे 1959 यावर्षी लिखाण आणि प्रकाशन झाले. महाराष्ट्र राज्य शासनाचा उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार फकिरा या कादंबरीला 1961 साली प्राप्त झाला. भारतीय भाषेबरोबर जागीतिक भाषेत जसे की, जर्मन, पोलीस, रशियन, झेक आणि इतर भाषेत फकिरा प्रकाशित झाली . फकिरा या कादंबरीच्या माध्यमातून अण्णाभाऊ साठे यांनी बदलाचे तत्त्वज्ञान म्हणजेच, Philosophy of change अर्थात चेंजचे तत्त्वज्ञान निर्माण केले आहे.

अण्णाभाऊं साठेंचे जीवनच तसे परिवर्तनशील राहिलेले आहे . लहानपणापासून अर्थात कळत्या वयापासून अण्णाभाऊंनी वेगवेगळ्या आघाड्यांवरती प्रत्यक्षपणे काम केलेले आहे म्हणून त्यांच्या जीवनात , विचारात आणि साहित्यकृतीत परिस्थितीच्या रेट्याने सातत्याने बदल घडत गेलेले आहे . हे अण्णाभाऊंच्या एकंदरीत जीवन प्रवासातून तसेच त्यांच्या साहित्य आणि इतर अनेक प्रसंगातून समोर येते.

अण्णाभाऊंच्या बदलाच्या तत्त्वज्ञानाच्या अन्वयार्थाने , बदल म्हणजे चेंज आणि चेंज म्हणजे इतिहास. खरे तर, बाबासाहेबांना चेंज हा शब्द खूप आवडायचा, म्हणून बाबासाहेबांनी चेंज शब्दाचा अर्थ इतिहास (History) असा सांगितलेला आहे. इतिहास घडण्याची-घडविण्याची किंबहुना निर्माणाची प्रक्रिया ही बदलातून अर्थात चेंज (Change ) मधून होत असते

म्हणून Change means History असेही बाबासाहेब म्हणायचे. मानव मुक्तीचे प्रणेते, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 1923 पासून बहिष्कृत हितकारणी सभा ते 1936 ला स्वतंत्र मजूर पक्ष, 1942 साली शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन आणि 1956 साली भारतीय रिपब्लिकन पक्ष अशा सामाजिक हित जोपासणाऱ्या राजकीय पक्षाच्या माध्यमातून बहुजन समाज शासनकर्ती जमात निर्माण व्हावी या प्रांजळ हेतूने बाबासाहेबांनी राजकीय पक्षाची स्थापना केली याला इतिहास साक्ष आहेच एवढेच करून ते थांबले नाहीत, तर विविध जातीनिहाय परिषदा जसे की, मांग परिषद, मांग - महार परिषद आणि संयुक्तपणे मांग, महार आणि चांभार अशा अनेक परिषदा व कृती कार्यक्रमाच्या माध्यमातून बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य समाजामध्ये एकजिनसीपणा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. स्वाभिमान आणि आत्मभान निर्माण करणाऱ्या लढाया अर्थात महाडचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश आणि अशा अनेक कृती चळवळीच्या माध्यमातून बाबासाहेब आंबेडकरांनी दलित - बहुजनांना स्वत्वाची जाणीव करून देण्यासाठीच्या अर्थात माणसाला माणसातील सूर्य दाखविण्याचा मार्ग प्रदान करून जागृती आणि आत्मभानाची जाणीव निर्माण करून देणाऱ्या मानव मुक्तीचे विविध कृतिशील कार्यक्रम राबविले . मूकनायक, जनता आणि बहिष्कृत भारत या मूखपत्राच्या आणि पत्रकारितेच्या माध्यमातून अस्पृश्य बहुजनांच्या - वैचारिक आणि बौद्धिक क्षमता विकसित करण्याचाही प्रयत्न बाबासाहेबांनी केलेला आहे. परिवर्तनवादी विविध कार्याक्रर्माच्या आणि वैचारिक

संदेशाच्या माध्यमातून उपेक्षित - अस्पृश्य समाजालाच नव्हे तर आदिवासी, भटके आणि इतर मागासवर्गीयांसाठी त्यांचे हक्क - अधिकार आणि माणूस म्हणून त्यांची प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी अहोरात्र आपल्या विद्वत्तेच्या जोरावर आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःला समर्पित केलेले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देश घडविणाऱ्या आणि देशाला जीवनमूल्य समर्पित करणाऱ्या भारतीय संविधानाच्या माध्यमातून शूद्रातिशूद्र आणि बहुजन समाजासाठी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता तसेच दर्जाची आणि संधीची समानता प्रदान करून देशाच्या बहुसंख्यकांना त्यांचे मानवी मूल्य आणि मानवी प्रतिष्ठा प्रदान केलेली आहे. यातून लोकशाही समाजवादाचा सिद्धांत जगासमोर मांडला म्हणूनच अण्णाभाऊ साठे यांनी स्वातंत्र्य, समता- बंधुता ,आणि सामाजिक न्याय व नैतिक मूल्यांचे अधिष्ठान निर्माण करणारी नीतिमूल्य आणि सामाजिक नाळ जपणारी (Pay back to society), झुंजार माणासांची फकिरा कादंबरी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केली आहे . हे अण्णाभाऊंचे क्रांतिकारित्व.

त्याबरोबरच अण्णाभाऊंनी फकिरा कादंबरीच्या निमित्ताने मांडलेली कैफियत, त्यात अण्णाभाऊ लिहितात, "प्रतिभेला सत्याचं जीवन दर्शन नसेल तर प्रतिभा, अनुभूती वगैरे शब्द निरर्थक ठरतात असा माझा अनुभव आहे कारण सत्याला जीवनाचा आधार नसलाकी, प्रतिभा अंधारातील

आरशाप्रमाणे निरुपयोगी ठरते . मग कितीही प्रयत्न करून प्रतिबिंब दिसत नाही आणि कल्पकता निर्बल होते . अगदी पंख विरहित पाखरा प्रमाणे, ती उडू शकत नाही. जशी प्रतिभेला वास्तवाची गरज भासते तद्वतच कल्पनेलाही जीवनाचे पंख असणे आवश्यक असते आणि अनुभूतीला सहानुभूतीची जोड नसेल तर आपण का लिहितो? याचा पत्ताच लागणं शक्य नाही म्हनुण मी लिहिताना सदैव सहानुभूतीनं लिहिण्याचा प्रयत्न करतो कारण मी ज्यांच्याविषयी लिहितो, ती माझी माणसं असतात त्यांची मुर्वत ठेवूनच . मला लिहिणे भाग पडतं .‘फकिरा’ तर माझा होता . मी जे पाहिल, अनुभवलं, मग अक्कांन, आप्पानं, त्या गावानं , माळानं आणि खोऱ्यानं मला जे जे सांगितलं आहे, फकिरा आत्मसमर्पणची वाट कसा चालला आहे तेचं मी ऐकलं. डोंगरात त्याच्या पायथ्याला विखूरलेले फकिराचे कर्तृत्व एकत्र करून हा फकिराचा इमला उभारलेला आहे” . त्या विचार परंपरेचा वारसा सांगताना, अण्णाभाऊ लिहितात, “हेतू एवढांच की, तो उपेक्षित होता,आंधारात होता.” तो प्रकाशात यावा या प्रांजळ हेतूने मी जगासमोर मांडला आहे, पुढे अण्णाभाऊ लिहितात, “उपेक्षितांचा उत्कर्ष व्हावा म्हणून या महाराष्ट्रात अविरत कष्टाचे डोंगर उलथणाऱ्यांची मोठी परंपरा आहे . त्यात पहिले नाव महात्मा फुले यांचे आहे” (संदर्भ- फकीरा कादंबरीतील कैफियत).

क्रांतीबा ज्योतिबा महात्मा फुले यांच्या समग्र परिवर्तनाचा आणि मानव मुक्तीचा लढा 1848 च्या अगोदर पासून सुरू होता. देव - धर्माच्या संकल्पना नाकारून फक्त मानव आणि त्या मानवी समूहाचे

सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक परिवर्तन झाले पाहिजे म्हणून "मनुस्मृतीचा धिक्कार" हा पहिला निबंध 1854 साली महात्मा फुलेंनी लिहिला. त्यानंतर 1873 यावर्षी "सत्यशोधक समाज" आणि 1889 साली सनातनी धर्माला पर्याय म्हणून "सार्वजनिक सत्य धर्म" हे ग्रंथ मानवी जीवन जगण्याच्या प्रक्रियेचा भाग म्हणून या ग्रंथाची निर्मिती केली. सत्यशोधन आणि सत्यवर्तनातून समाजात क्रांतिकारी परिवर्तन आणि त्यातून उपेक्षितांचे उत्कर्ष करणाऱ्या क्रांतीपिता ज्योतिबा फुले यांचा फकिरा कादंबरीतील कैफियतमधील केलेला उल्लेख हा महत्वाचा आहे त्याचबरोबर फकिराच्या तलवारीकडे आणि तलवारीच्या धारेकडे पाहून जॉनसाहेब म्हणाले, "ही तलवार कोठे मिळाली ?" फकिरा म्हणतो, “ही तलवार माझ्या पूर्वजाला शिवाजीराजांनी दिली”. पुढे फकिरा धीर गंभीर होवून म्हणतो, “ही तलवार घेऊन माझा बाप खोता संग लढला आणि हीच तलवार घेऊन मी तुमच्याशी लढलो.” हे फकिराचे जॉन साहेबांच्या समोरचे निवेदन म्हणजे आम्ही छत्रपती शिवाजी राजाचा विचार वारसा जपणारे आहोत. आम्ही न्यायी, सर्जनशिल, समाजशिल,आणि पराक्रमी आहोत. शिवाजी राजांच्या विचारांना अभिवादन करत माझ्या वंशजांनी रयतेचे राज्य उभारणी साठी रक्ताचे सडे सांडले आहेत. आम्ही या तलवारीच्या जोरावर आणि अपार हिंमतीवर माणासाचे सुराज्य निमार्ण करण्यासाठीच इथल्या अन्यायी व्यवस्थेच्या विरोधात आजही आम्ही लढतो आहोत. हे अण्णाभाऊंनी सिद्ध केलेले आहे. तीच फकिरा कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण करतात. हा योगायोग नाही तर छत्रपती शिवाजी महाराज -

फुले-आंबेडकरी विचारधारेचे वैचारिक अधिष्ठान म्हणून अण्णाभाउंनी जाणीवपूर्वक केलेली कृती आहे. याचे गांभीर्यपूर्वक आकलन करण्याची गरज आहे. वर्ण- वर्ग - स्त्रीदास्य विरोधी आणि बदलाच्या सिद्धांताची एकनिष्ठता यानिमित्ताने अण्णाभाऊंनी जपलेली आहे. ज्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक गुरु क्रांतीपिता महात्मा फुले- सावित्रीमाईशी क्रांतिवीर लहुजी साळवे यांच्याशी झालेला वैचारिक सहवास, परिवर्तनवादी विचारांची देवाण-घेवाण आणि घुसळण या सर्व विचार- व्यवहाराचा परिणाम म्हणून की काय? लहुजीं- फुले- सावित्रीमाईच्या क्रांतिकारी विचारातून निर्माण झालेला क्रांतिकारी संस्कार म्हणजे क्रांतीनायिका मुक्ता साळवे. जसे की, शिवाजी- लहुजी- फुले- सावित्री -मुक्ता ही सत्यशोधकी आणि सत्यवर्तन या विचारपरंपरेच्या उगमस्थानाशी वैचारिक नाळ जोडणारे बाबासाहेब आणि अण्णाभाऊ यांच्या तत्वज्ञानाचा संगम, फकिरा कादंबरीच्या निमित्ताने वैचारिक विचाराचा समन्वय ही बदलाची निशाणी आहे तर मानवी समाजाच्या समग्र बदलासाठी अण्णाभाऊ साठेंनी जाणीवपूर्वक केलेली बदलाची (परिवर्तनाची) कृती आहे. असे स्पष्ट जाणवते. या अन्वयार्थने फकिरा कादंबरीतील मूल्यांच्या तत्त्वज्ञानाचे चिंतन करणे मला आवश्यक वाटते. अण्णाभाऊंची फकिरा ही सर्वश्रेष्ठ कादंबरी आणि कादंबरीतील मानवी जीवन आणि मूल्यांचे तत्त्वज्ञान अण्णाभाऊंनी अधोरेखित केलेले आहे. अण्णाभाऊ आणि अण्णाभाऊंच्या फकिराची भूमिका समाजशील, परिवर्तनवादी, सामाजिक एकोपा. परिवाराची काळजी, विषमतावादी सत्तेच्या विरोधातील लढा, आणि माणूस.

माणूस जगला पाहिजे म्हणून माणूस महत्वाचा, माणसा शिवाय या जगात उन्नत, परिवर्तनीय आणि वास्तव सत्य काय आहे? तर पृथ्वीवरील वास्तव आणि अंतिम सत्य माणूस म्हणून माणूस महत्त्वाचा. तो जगला पाहिजे. माणसांच्या अधिकार संपन्न जगण्यासाठीच अण्णाभाऊंच्या फकिराचे बंड - संघर्ष आणि विद्रोह होता. अन्यायाविरुद्धची धग वैयक्तिक नव्हे तर सामाजिक संदर्भ घेऊन निर्माण झालेली होती. फकिरा ही कादंबरी शोषित, पीडित, कामगार – मजूर, भुकेकंगाल आणि आदिवासी या समग्र उपेक्षित समाजाचे अर्थात सर्व मानवी समूहाचे प्रतिनिधित्व करते म्हणून चार्वाक ते अण्णाभाऊ ही परिवर्तनाची साखळी फकिराच्या तत्त्वज्ञानातून अधोरेखित होते.

**फकिराचे तत्त्वज्ञान हे .....**

- सामाजिक न्यायाचे तत्त्वज्ञान
- स्वातंत्र्य, समता-बंधु-भावाचे तत्त्वज्ञान
- नैतिकतेचे तत्त्वज्ञान आहे.
- सामाजिक बांधिलकीचे तत्त्वज्ञान.( Pay back to Society)
- बंड - संघर्ष आणि विद्रोहाचे तत्त्वज्ञान
- भाकरीचे तत्त्वज्ञान
- ज्ञान - विज्ञानाचे तत्त्वज्ञान

तत्त्वज्ञान म्हणजे काय? खरेतर तत्वज्ञानाचे कार्य हे जगाची पुनर्रचना करण्याचे असते. चिंतनाच्या प्रक्रियेतून सिंथेसिस (Synthesis) झालेली नव

विचारधारा म्हणजे तत्त्वज्ञान असे मला वाटते. माणसाकडे आणि मानवी समाज जीवनाकडे विवेकी आणि संवेदनशील मनाने पाहणे, त्या समाजाला अभ्यासणे, समाजाचे निरीक्षण - परीक्षण करणे, त्यातून निर्माण होणारे चिंतन म्हणजे तत्त्वज्ञान. मूल्य जपणारी जीवन प्रक्रिया म्हणजे तत्त्वज्ञान. कोणतेही तत्त्वज्ञान त्या काळाशी विवेकी आणि संवादी असते. तेच तत्त्वज्ञान चिरकाल टिकते. ज्यांचे तत्त्वज्ञान त्या त्या काळाच्या सामाजिक परिस्थितीशी सुसंगत असते तेच तत्त्वज्ञानी किंवा तत्त्ववेत्ते ठरतात. अगदी तद्वतच अण्णाभाऊचेही आहे कारण अण्णाभाऊंचे तत्त्वज्ञान त्या त्या काळाशी चिरकाल टिकणारे आहे म्हणून ते तत्वज्ञानी आहेत. खरे तर मूल्यांचा पालनकर्ता म्हणजे तत्त्ववेत्ता किंवा विचारवंत. Who loves truth? या अर्थाने अण्णाभाऊ साठे हे मूल्यांचे पालक होते. अण्णाभाऊ हे सर्वसामान्य व्यक्तिमत्व नव्हे तर असामान्य व्यक्तिमत्व आहे. या जगातील एक आश्चर्य म्हणूनच अण्णाभाऊंच्याकडे पहावे लागते. सत्यशोधकी अण्णाभाऊ यांचा वैचारिक विचाराचा समन्वय हा महात्मा फुले याच्या खांद्याला-खांदा लावून शिक्षणाचे बीज देशात पेरण्यासाठी म्हणून महारा – मांगाच्या मुला – मुलींना ज्योतीबाच्या शाळेत घेऊन जाणारे, सावित्रीमाईच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारणारे आणि नव – नवीन शाळा निर्मितीच्या कार्यातील भूमिगत कर्ते - धर्ते क्रांतीवीर लहूजी साळवे ज्यांनी छत्रपती शिवरायांच्या समाधीची जागा ज्योतीबा फुले यांना दाखविणारे आणि महात्मा फुले – सावित्रीच्या सुखा दु:खात आणि शैक्षणिक कार्यात वडिलकीची भूमिका बजावणारे, महात्मा फुले - सावित्री त्यांचे वैचारीक

क्रांतीगुरू म्हणून  क्रांतीवीर लहुजी साळवे  यांच्या विचारधारेची  नाळ  ही शिवाजी राजेंच्या रयतेच्या सुराज्याशी  जुळली जात असल्याने फकिराच्या समग्र पराक्रमाची विचारधारा छत्रपती शिवाजी – क्रांतीवीर लहूजी – क्रांतीबा फुले – डॉ.बाबासाहेब आंबडेकर  यांच्या सर्वंकश परिर्वतनाच्या विचारधारेने मार्गक्रमण करते. या अन्वयार्थाने अण्णाभाऊ साठे हे शिवाजी – लहूजी – फुले  - आंबेडकरी विचांराचा वारसा निर्माण करणारे व जपणारे होते. या विचार वारसांचा परिणाम म्हणूनच अण्णाभाऊ साठे हे विविध आघाड्यावर महत्वपूर्ण कामगिरी करत होते. हे खालील प्रमाणे निर्देशित होते.

- जागतिक मजूर - कामगाराचे झुंजार नेते.
- संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे प्रणेते.
- वर्ण-वर्ग-स्त्रीदास्य विरोधी साहित्याचे आणि तत्त्वज्ञानाचे निर्माते.
- 1944, साली निर्माण झालेल्या लाल बावटा पथकाचेही निर्माते.
- 1949, साली निर्माण झालेल्या ईप्टा (IPTA-Indian Peoples Theatre Association) या संस्थेचे अध्यक्ष म्हणुनही अण्णाभाऊंचा सन्मान झालेला आहे. 1958 साली या देशातील पहिल्या अखिल भारतीय दलित साहित्य संमेलनाचे उदघाटक आणि उदघाटनपर भाषणात चिंतनशील क्रांतिकारी विचारधारा अण्णाभाऊंनी चिकित्सकपणे मांडलेली आहे. या सर्व अर्थाने अण्णाभाऊंची वैचारिकता आणि फकिरा कादंबरीतील तत्त्वज्ञान जाणीवपूर्वक अभ्यासण्याची मला गरज वाटते. अण्णाभाऊंच्या फकीरा कादंबरीतील तत्त्वज्ञान हे उपेक्षित, जन - माणसांसाठी समता, बंधुता,

न्याय तसेच बहुजन सुखाय आणि बहुजन हिताय हे निसर्गाने प्रदान केलेले मूलभूत हक्क प्रस्थापित झाले पाहिजे आणि सर्वसामान्य माणसे अधिकारसंपन्न व्हावेत यासाठीचा आग्रह धरते.

फकिरा कादंबरीची सुरुवातच ही फकिराचे वडील राणोजी मांगाच्या त्याग आणि समर्पणाने निर्माण झालेली आहे. गावासाठी जोगणी आणणे आणि त्यात स्वतः समर्पित होणे. हा राणोजीचा त्याग. नेमकी जोगणी म्हणजे काय? जोगणी अनेक वर्षापासून चालत आलेली गावगाड्यातील परंपरा आहे. ज्या गावात जोगणी भरली त्या गावाचं आणि गावाच्या परिसराचं दुःख, दारिद्र्य टळते ही जन-माणसांची श्रद्धा होती. ज्या गावात जोगणी आली. त्या गावासहीत आजूबाजूचा परिसर सुजलाम- सुफलाम होतो म्हणून फकिराचे वडील राणोजी मांग वाटेगावात जोगणी आणण्यासाठी स्वतःचे बलिदान देतात. राणोजी मांग म्हणतात, मी वाटेगावात जोगणी आणली तर गावावर अनंत उपकार होतील. मी मेलोच! तर गावासाठी, परिसरासाठी मेला म्हणतील, आपल्या अंगावरच्या जखमा गावाच्या काळजावरच्या मोहऱ्या ठरतील. उपेक्षित मानवी समूहाला सुखाने जगता येईल हा आशावाद घेऊन राणोजी मांग विचार करतो. ( संदर्भ फकिरा – पेज नंबर,०८). राणोजीचा त्याग आणि मानवाच्या सुहितासाठी तथागत बुद्धाच्या त्यागाची या ठिकाणी आठवण होते. कपिलवस्तू या शाक्यांच्या राजधानीच्या सीमेला लागून कोलीयाचे राज्य होते. रोहिणी नदीमुळे ही दोन्ही राज्ये विभागली गेली होती. रोहिणी नदीचे पाणी शाक्य व कोलिया हे दोघेही आपापल्या शेती सिंचना करिता वापरत होते. रोहिणी नदीचे पाणी प्रथम कोणी व किती घ्यावे

याबद्दल प्रत्येक हंगामात वाद आणि वादाची परिणीती भांडणात आणि त्याची परिणीती मारामारीत आणि रक्तपातात होत असे. रोहिणी नदीच्या पाणी वाटपासंबंधी शाक्यांनी कोलियांच्या विरोधात युद्ध पुकारले. या ठरावाला सिद्धार्थ गौतम बुद्धाने विरोध केला. युद्धातून सुख शांती निर्माण होत नाही. रोहिणी नदीचे पाणी शाक्य आणि कोलियांनी रक्तपात न होऊ देता न्यायाने वापरावे. जलसंपत्तीचा दोन्हीही राज्याच्या शेती- सिंचनासाठी वापर करावा आणि आनंदाने जगावे तो परिसर सुजलाम सुफलाम आणि अधिकार संपन्न व्हावा. वैरभाव - भांडण, रक्तपात होऊ नये आणि शाक्य -कोलिया या दोघांचेही सुहित लक्षात घेऊनचं शाक्यांने पुकारलेल्या युद्धाच्या विरोधात बुद्धाने ठराव मांडला (संदर्भ – बुध्द आणि त्याचा धम्म पृष्ठ क्रं 27). परिणामी बुद्धाला परिव्रजा घ्यावी लागली. देश, राजवाडा आणि घर - संसार सोडून संन्यास घ्यावा लागला. मानवी समूह सुजलाम-सुफलाम, सुखी संपन्न व्हावा. मानवी समाजात बहुजन हिताय - बहुजन सुखाय हे तत्त्वज्ञान निर्माण व्हावे . यासाठीच म्हणून बुद्धाचे हे त्याग - समर्पण मानवी समूहासाठीच किंबहुना मानवाच्या कल्याणासाठीचं. तद्वतच राणोजीचे त्याग - समर्पण मानवी कल्याणासाठी, मानवी समाजाच्या सुख - संपन्नतेसाठीच म्हणून सिद्धार्थ गौतम बुद्ध आणि राणोजी या दोघांनी केलेला त्याग आणि त्यांचे समर्पण ही थिम (Theme) सारखीच असल्याने हा नवा जीवनवाद समाजाला दिशादर्शक ठरतो.

## न्यायाचे तत्त्वज्ञान....

अण्णाभाऊंचा फकिरा हा न्यायवादी आहे. न्याय म्हणजे काय? तर, ज्याचे देणे लागते त्यांना देणे म्हणजे न्याय. या साध्या-सरळ आणि सोप्या अर्थाने न्याय या संकल्पनेतूनचं फकिरा सामाजिक न्याय प्रदान करतो. जे जे वंचित आहेत त्यांना न्याय प्रदान करणे हाच सामाजिक न्याय होय. दुष्काळात आणि रोगराईत समाजाला जगविण्यासाठी लुटलेले धान्याचे कोठार आणि त्या धान्याचे समान वाटप झाल्यानंतर उरलेले धान्य ते मापाने वाटता येणार नाही म्हणून फकिरा म्हणतो, "डाव घ्या आणि डावानं सारखं वाटा. एकही दाणा गैर वाटू नका. एक-एक दाणा एका-एका माणसाला एक दिवस जगविल. हे विसरू नका". हे सामाजिक भान व धारणा सोबत घेऊन बंधुभाव, समतेच्या आणि सामाजिक न्यायाच्या नात्याने अण्णाभाऊंचा फकिरा कृतीतून विषमतावादी समाजरचनेच्या आणि शक्तिशाली इंग्रजी सत्तेच्या विरोधात दुष्काळाच्या आणि रोगराईच्या साथीने मरणाऱ्या शेकडो माणसांना जगविण्यासाठी संघर्ष करतो. या अनुषंगाने फकिराच्या सर्जनशील आणि समाजशील कृत्यावर चिंतन करत असताना, १९४९ साली भारताने अंगीकृत केलेल्या भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यातील दर्जाची आणि संधीची समानता समाजिक न्यायाने फकिरा प्रदान करतो.

माणसे दुष्काळामुळे आणि रोगराईमुळे अर्थात भूक बळीने मरतात म्हणून अण्णाभाऊंचा हा फकिरा रडत बसला नाही. तर ती सर्व माणस

जगली पाहिजेत. जिवंत राहिली पाहिजेत. यासाठी फकिरा लढतो आणि माळेवाडीच्या मटकऱ्यांचे धान्याचे गोदाम समाजाला जगविण्यासाठी लुटतो. फकिराची ही बंडाची लढावू कृती सामाजिक नाळेतून निर्माण झालेली. परिवर्तनाची आणि क्रांतीची साक्ष ठरते. फकिराच्या समाजशील कृतीचे अध्ययन केल्यानंतर मला मॅक्झिम गॉर्की त्यांच्या आई या कादंबरीची आठवण येते, कम्युनिस्ट चळवळीचे सर्व कार्यकर्ते आणि आघाडीचे नेते भूमिगत तर, काही आघाडीचे साम्यवादी क्रांतिकारक जेलमध्ये असताना कम्यूनिष्ठ चळवळ बेचिराख होते की काय ? अशा अवस्थेत गॉर्कीची आई रडत बसली नाही. तर साम्यवादाची क्रांतिकारी विचारधारा चळवळीला बळ देणारी, दीनदलित कष्टकऱ्यांची राज्य निर्माण करणारी आहे, अर्थात कम्युनिस्ट चळवळ उद्‌ध्वस्त होऊ नये म्हणून मॅक्झिम गॉर्कीची आई साम्यवादी चळवळीचे परिपत्रके भाजीपाल्याच्या पिशवीतून वाटते आणि कम्युनिस्ट चळवळीला जनमानसात रुजवण्याचे काम गॉर्कीची मदर करते या अनुषंगाने द हिंदू या जागतिक पातळीवरील वृत्तपत्रातील 'साम्यावादी साहित्य आणि स्त्री' या लेखात (Gorki's Mother is not sorrow of Mother but she is mighty of Mother) असे म्हटले जाते. (संदर्भ – Article on – Soviet Literature and Woman, The Hindu – 1989) या अन्वयार्थाने विचार करता, अण्णाभाऊंचा फकिरा दुष्काळाच्या आणि रोगराईच्या खाईत कुत्र्यासारखी माणसं मरत असताना फकिरा रडत बसला का ? नाही, तर त्यांनी माळेवाडीतील मटकरीच्या मठातील धान्याचं कोठार लुटून गावातील प्रत्येक घरात धान्याची पोती

पोहोचवून समतेच्या, न्यायाने वाटणी केली आणि माणसांना जगविण्यासाठीचा संघर्ष केला आणि माणसांना जगविले आणि जागविले सुद्धा. म्हणून Annabhu's Fakira is not sorrow of Fakira but he is mighty of Fakira. He inspire for struggle and also to stand against injustices. या अर्थाने अण्णाभाऊंच्या फकिरा कादंबरीतील मानवी न्यायवादी मूल्याचे तत्त्वज्ञान साम्यवादी विचारवंत कार्लमार्क्स आणि मॅक्झिम गॉर्की यांच्या तत्त्वज्ञानाची जातकुळी सांगणारे वाटते. नव्हे तर आहेच. फकिरा आपले सर्व बंडकरी साथी - सोबती यांना बंधु-भावाची आणि माणूस म्हणून सन्मानाची वागणूक देतो. सामाजिक समता आणि न्याय प्रदान करतो म्हणून फकिराचे तत्त्वज्ञान स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय समाजात प्रस्थापित करते.

**नैतिकतेचे तत्त्वज्ञान....**

मानवी समाज जीवन नैतिकतेच्या अधिष्ठानावर जगत असते म्हणून मानवी समूहात आणि माणसा-माणसात नैतिकता असणे आणि जोपासली जाणे हे सामाजिक एकात्मतेच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे आहे. त्याशिवाय जीवनाला अर्थ प्राप्त होत नाही. म्हणून नैतिकता अर्थात नीतिमूल्य सातत्याने समाजात पेरले गेले पाहिजेत. नैतिक, विवेकी आणि इमानदार माणसेच सुखमय समाज जीवनाची जडणघडण करीत असतात.

नैतिकता (Morality) हे माणसांच्या समाज जीवनाचा महत्त्वाचा अविभाज्य भाग आहे. अनेक विचारवंतांनी नैतिकता या मानवी मूल्यांच्या

संकल्पनेचा विविधांगांनी अर्थ लावलेला आहे. नैतिकता म्हणजे शुद्ध नीतीवाद (Moralism) असे म्हटले जाते. नैतिकता ही समाज जीवनाचे नियमन करणारी अमूर्त शक्ती आहे नव्हे तर मानवी समूहात जगण्याची जीवन प्रक्रिया आहे. नैतिकता ही स्त्री-पुरुष संबंधांच्या नात्यानेच निर्माण होते असे नाही तर मानवी भाव – भावना, रोजच्या मानवी जीवनातील आणि मानवी नितीशी संबंधीत असणारे सर्व सामाजिक हितसंबंध आणि मानवी समूहाच्या रोजच्या जगण्यातल्या प्रत्येक व्यवहारांशी घट्ट नाते निर्माण करते. नीतिमत्ता हे तत्त्वज्ञान समाज जीवनाच्या फक्त इज्जतीची नाते सांगणारे नसून ते मानवी अस्मिता, आत्मभान आणि आत्मसन्मानांशी नाते सांगते म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, “आम्हाला भाकरीपेक्षाही आमची इज्जत (स्वाभिमान आणि आत्मसन्मान) महत्वाची आहे”. तेच तत्त्वज्ञान अण्णाभाऊ साठेंच्या फकिराने 1920 च्या कालखंडा दरम्यान आज्ञानी आणि कष्टांवर जगणाऱ्या समाजामध्ये पेरले आणि रुजविले आहे. समाज जीवनात नीतिमूल्ये जोपासणारी आणि नीतिमूल्यांची जडणघडण करणारी अप्रतिम कलाकृती म्हणून फकिराकडे पाहिले जाते. फकिरा हा दलित, उपेक्षित, कामगार आणि शेतकरी या समाज जीवनातील त्याग- समर्पणाचा आणि निती मूल्यांना जोपासणारा आणि जपणारा लढवय्या क्रांतिकारक तर आहेच त्याही पुढे जाता क्रांतिसिंह म्हणून फकिराकडे पाहिले पाहिजे. 1920 साली फकिरा आणि आणि त्यांच्या साथीदारांनी भेडसगावाचा इंग्रजांचा सरकारी खजिना लुटला. खजिना वाटून घेताना, फकिरा म्हणतो, आपल्या गोरगरीब समाजासाठी दोन समान वाटणी (मांग आणि महार

समाजासाठी) करा आणि राहिलेला खजिना सगळ्यांनी समान वाटून घ्या. ही सामाजिक नाळेची, समाज बांधिलकीचे विचार म्हणजे, **Pay Back To Society** हा संदेश 1920 साली फकिराने जनमाणसामध्ये रुजविला. आणि समाजावर गुलामी लादणाऱ्या इंग्रजी सत्तेच्या विरोधात सशस्त्र लढा पुकारला. मला वाटतंय, 1943 साली क्रांतिसिंह नाना पाटलांच्या प्रतिसरकारने वाळवा तालुक्यातील ताकरी या गावा जवळ इंग्रजांचा खजिना घेऊन जाणाऱ्या रेल्वेतील खजिना लुटला त्यापूर्वी तब्बल 23 वर्षांअगोदर फकिराने इंग्रजी सरकारचा खजिना लुटला होता. ही क्रांती क्रांतिकारकाची आणि क्रांतीसिंहाचीच असते. असे क्रांतीसिंह वारणा परिसरात निर्माण होणे म्हणजे त्या परिसराला क्रांतीचं लेणं आहे असे वाटते.

## भेडसगावचा इंग्रजी (सरकारी) खजिना,

इंग्रजांनी शेतकरी, राजेरजवाडे यांच्याकडून सक्तीने वसूल केलेला कर. भेडसगावच्या वाड्यात जमा केला जात असे. आणि त्यानंतर तो वसूल जवानाच्या सुरक्षिततेत कोल्हापूरला रवाना केला जात असे. त्या खजिन्याचे रक्षण रघुनाथ ब्राह्मण हा इमाने इतबारे सरकारी चाकर म्हणून करत होता. जेंव्हा फकिरा आणि त्यांचे बंडकरी खजिना लुटण्यासाठी म्हणून वाड्यात प्रवेश करतात, तेव्हा रघुनाथ ब्राह्मण एका दाराला उभा होता. त्याला फकिराने विचारले, खजिना कुठे आहे? तेव्हा रघुनाथ ब्राह्मणांनी पाठीमागच्या रूममध्ये आहे. असे सांगितले असता फकिराला आश्चर्य वाटले! खजिना तर बाजूच्या रूममध्ये आहे आणि हा या दारासमोर का उभा

आहे? नक्कीच येथे काही न काही आहेच. फकिराने  दारावर लाथ मारली तेंव्हाचा, प्रसंग..... रघुनाथ ब्राह्मणाची बायको फकिराला हात जोडून विनंती करते आणि म्हणते, हा वाडा धूवून घेऊन जा बाबा, या माझ्या दोन्ही मुलीची लग्न झालेली नाहीत. मी पदर पसरून भीक मागते, आमची अब्रू........ आणि आपापले दागिने उतरवून ठेवू लागतात. तेव्हा फकिरा म्हणतो, “आई थांबा, मी खजिना नेणार हाय, तुमास्नी ओरबडायला मी आलो नाय. अब्रू खाऊन उपाशी माणसं जगत नसतात?.” हे फकिराचे बोल म्हणजे नैतिकतेचा उच्चांक आहे नव्हे तर नैतिक मूल्यांच्या तत्त्वज्ञानाचे शिलालेख आहेत या प्रसंगातून समाजाला जागविण्याचे आणि समाजात नैतिक मूल्यांची धारणा निर्माण करणे हेच स्पष्ट होते. नैतिक मूल्यांच्या संबंधाने मला अमेरिकन लेखक **(Jon Londan)** जॉन लंडनची आठवण येते. जॉन लंडन हा 49 वर्षे जगला. तो लेखक- कथाकार म्हणून प्रसिद्ध, अल्पशिक्षित वर्गातून आलेला. अमेरिकन भांडवलशाही व साम्राज्यवाद्यांनी गुलाम केलेल्या दलित, पीडित व गुलाम अवस्थेत खितपत पडलेल्या काळ्या - पांढऱ्या समाजाचा लेखक. जॉन लंडनच्या बद्दल लिहिले जाते, "He earned more than a millions dollars by his pen and he died flat broke " जॉन लंडनने अब्जावधी डॉलर्स त्यांच्या पेनने कमविले आणि मरताना मात्र भग्न आणि कफल्लक अवस्थेत मेला. जॉन लंडनने काळ्या – पांढ-या समाजातील वास्तव आणि भयंकर मानवी जीवन चितारले आणि नैतिकमूल्यांचे अधिष्ठान समाजामध्ये निर्माण केले.

जॉन लंडनला विचारले जाते की, तुमच्या कथा इतक्या कशा भंयकर? तेंव्हा जॉन लंडन उत्तर देतो, जीवनच भंयकर म्हणून कथा ही भयंकर आणि वास्तव. जॉन लंडनची एक कथा त्या कथतेतील अमेरिकन रेड इंडियन नायिका तिचे सौदर्य त्या तरूणीच्या मांडयात बहरलेले होते. अमेरिकेतील तरूणीची सुदंरता तिच्या मांडयात असते. असे जॉन लंडननी लिहिले आहे. ती रेड इडियन नायिका तिच्या काळया समाजाला गुलाम बनविणाऱ्या गोऱ्याशी लगट होते. म्हणून त्या नायिकेचा बाप, तिच्या सुंदरतेने मुसमुसलेल्या मांडया करवताने कापतो. या कथेच्या माध्यामातून अमेरिकेतील कृष्णवर्णीय समाजाला जॉन लंडनची कथा नीतिमत्ता शिकविते. गो-या शोषकाच्या विरोधात जगण्याचे समाजिक शहाणपण मिळवून देते. त्याच समातंर सामाजिक भावनेने जॉन लंडनची 'नैतिकता जोपासणारी कथा' आणि आण्णाभाऊंची 'डोळे' ही कथा नीतिमत्ता शिकविते. आण्णाभाऊंच्या डोळे या कथेतील सुंदर डोळयाची गीता म्हणते, माझ्या सुंदर डोळयांमुळेच माझा सुखी संसार उध्वस्त झाला. हे डोळेच माझा घात करतील, माझी, माझ्या कुटूंबाची आणि माझ्या गावाची इज्जत जाईल. माझ्या अब्रूचे – धिंडवडे उडतील म्हणून आण्णाभाऊंच्या डोळे कथेतील नायिका गीता ही स्वता:च्या हाताने स्वता:चे डोळे फोडून घेते. ही सामाजिक नैतिकता जपण्यासाठी गीताचे हे भंयकर कृत्य समाजिक नैतिकता रुजविण्याचे कर्तव्य बजावते म्हणून जॉन लंडन आणि आण्णाभाऊंच्या कथाही भंयकर आणि वास्तव आहेत म्हणून आण्णाभाऊंच्या आणि जॉन लंडनच्या कथेतील साधर्म्य लक्षात घेता

अण्णाभाऊंच्या  कथा भांडवलशाहीच्या आणि वर्ण द्वेषी समाजव्यवस्थेच्या विरोधातील अमेरिकन लेखक जॉन लंडनच्या कथेशी वैचारिक नाते जोडणारी आणि पाश्चिमात्य  विचारवंताच्या  जात कुळीशी नाते  सांगणारी नि जपणारी आहे. असे माझ्या सारख्या वाचकाला वाटून जाते कारण अण्णाभाऊंच्या नैतिकमुल्य जोपासणाऱ्या विविध साहित्य कृतींनी वैश्विक नितीमत्तेचे  तत्त्वज्ञान निर्माण केले आहे.  तद्वतच. अण्णाभाऊ सुद्धा 49 वर्षे जगले. अण्णाभाऊ सुद्धा अल्पशिक्षित वर्गातून आलेले आणि अल्पशिक्षित असलेले पिळल्या गेलेल्या दलित,  कामगार आणि उपेक्षित माणसांचे लेखक म्हणून जागतिक पातळीवर नावारूपाला आलेले. सत्यशोधकी अण्णाभाऊ साठे .

अण्णाभाऊंनी अब्जावधी रुपये कमविले नाहीत तर हजारो-लाखो रुपये त्यांच्या पेनने  कमविले तरीपण अण्णाभाऊ सुद्धा भुकेकंगाल आणि भग्नावस्थेत गेले. या दोन्हीही विचारवंत – लेखकांच्या कथा आणि कादंबऱ्या मात्र भयंकर जीवन वास्तव मांडणाऱ्या आहेत कारण  हे  जगच भयंकर आहे आणि ते वास्तव आहे. म्हणून त्यांच्या कथा  भंयकर आहेत. चित्रा या  कादंबरीच्या मनोगतात आण्णाभाऊ म्हणतात, “मानवाला चकित करणाऱ्या काही घटना पृथ्वीच्या पाठीवर रोज घडतात. या भांडवली जगात कल्पनेला ही लाजवणारी वास्तवता वावरत आहे. ती वास्तवता भयंकर असते आणि त्या वास्तवतेतूनच माझ्या कादंबरीचा जन्म झाला. चित्रातील घटना अवास्तव वाटतील, नवीन वाटतील परंतु त्या सर्व खऱ्या आहेत. वास्तव आहेत. सत्य कधी दडत नाही.. नि मी ते का दडवावे?

ती सत्याशी बेइमानी होईल. या भीतीने मी सर्व प्रसंग जसेच्या तसे चित्रित केले आहेत." (संदर्भ-चित्रा कांदबरीतील प्रस्तवाना) ही अण्णाभाऊंची सत्याप्रती बौद्धिक संवदेनशील इमानदारी ही बौद्धिक संपदेच्या कार्यात कार्यरत असणाऱ्यांसाठी आदर्शवाद आहे. समाज जीवनातील आणि जगण्यातील भयानक वास्तवता आणि नैतिक मूल्यांची जडण-घडणही अमेरिकन विचारवंत-लेखक जॉन लंडन यांनीही मांडलेली आहे आणि अण्णाभाऊंनीही मांडलेली आहे म्हणून पश्चिमात्य तत्वज्ञानाशी नाते सांगणारे विचारवंत अण्णाभाऊ म्हणून वेगळे ठरतात.

## बंड -संघर्ष आणि विद्रोहाचे तत्त्वज्ञान....

बंड – संघर्ष आणि विद्रोह जगाच्या पाठीवर वेगवेगळया वर्चस्ववादी कारणातून सातत्याने निर्माण होत असते. कधी जात – वंश वर्चस्व, कधी धर्म वर्चस्व, कधी श्रेष्ठात्वाचे वर्चस्व आणि 1871 च्या इंग्रजांनी निर्माण केलेला गुन्हेगारी जमात कायद्याच्या विरोधात, ज्या कायद्याअंतर्गत मांग जमातीसह आदिवासी आणि गाव गाड्या बाहेरील जाती-जमातीचा समावेश होता. तब्बल 81 वर्ष या कठोर आणि काळया कायद्याच्या गुलामीत या जाती जमाती भरडल्या गेल्या. या कायद्याच्या विरोधात बिरसा मुंडा, तंट्या भिल्ल, क्रांतिवीर लहुजी, क्रांतिवीर उमाजी, फकीरा, सावळा मांग आणि निळू मांग त्यांच्या जाती जमाती इंग्रजाच्या विरोधात प्रखरपणे लढल्या. या कायद्यामुळे हद्दपारी, तीन वेळेची हजेरी, तीन महिने सक्तमजुरीच्या शिक्षा या गुन्हेगारी कायद्याच्या या फासात इंग्रजांनी अडकवलेली फकिराची जात-जमात म्हणून

फकीरा त्वेषाने म्हणत होता, “मी आता किती दिवस हजेरी द्यायची? आणि का द्यायची? ही गुलामी का? मी गुलाम नाही! मी हजेरी देणार नाही!” फकीरा आतून पेटला होता (संदर्भ फकीरा कादंबरी पृष्ठ क्रमांक 100). या सर्व वर्चस्ववादी व्यवस्थेच्या विरोधात फकिराचे बंड - संघर्ष आणि विद्रोह होता. हा विद्रोह व्यक्तीद्वेषी नव्हता तर, ते एका प्रवृत्तीच्या, विषमतेच्या विरोधातील बंड होते. खरे तर, एका अपरिवर्तनवादी विचारधारेच्या व गुलामीच्या विरोधात बंड - संघर्ष - विद्रोह आणि क्रांती केली जात असते. स्त्री शीलाच्या संवर्धनासाठी, मानवी मूल्य आणि मानवी प्रतिष्ठा जपण्यासाठी, गुलामी लादणाऱ्या व्यवस्थेच्या विरोधात आणि प्रतिक्रांतीच्या विरोधात परिवर्तनवादी क्रांती केली जाते. खरे तर, फकिरा ही संघर्षाची मालिकाच आहे आणि फकीरा हा संघर्षाचा महानायक आहे. एका प्रसंगी फकीरा म्हणतो; “कवा आम्ही सलामत होतो? आईच्या पोटातून बाहेर आल्यापासून नव्हं तर आईच्या पोटात होतो तवा पासनं रक्ताचे घोट घेतोय, लढतोय आम्ही कवाच सलामत नव्हतो. सांजीरबाच्या माळाला माझा बाप कटून मेला. तवा पासनं एक दिवस एक घडी मला सुखाची नाय. वैऱ्यांनी मला लाभू दिली नाही” म्हणून विषमतावादी व्यवस्थेच्या विरोधात समाज हितासाठी फकिराने वनवा पेटविला होता. (संदर्भ फकीरा कादंबरी पृष्ठ क्रमांक 118)

गाव - परिसर सुखाने जगावा. पीक - पाणी भरघोस पिकावे. संबंध परिसर समृद्ध व्हावा. याच इच्छेपोटी राणोजीचा संघर्ष आणि संघर्षाला रक्ताचा गंध. खरे तर क्रांतीलाही रक्ताचा गंध लागतो नव्हे तर क्रांतीला रक्ताचे नैवद्यही द्यावे लागते. रक्त सांडल्या शिवाय आणि त्याग - समर्पणाशिवाय

क्रांती व नवनिर्मिती होत नसते, हे सूत्र जणू राणोजीला माहित होते म्हणूनच राणोजीने गावासाठी स्वतःला समर्पित केले. हे त्याग - समर्पणाचे आणि बंड - संघर्षाचे तत्त्वज्ञान अण्णाभाऊंच्या फकिराने पेरले.

फकिरा संबंधी इंग्रजी प्रांत अधिकारी जॉन मायकल हा पाटलाला विचारतो, फकिरा कसा आहे? . तेव्हा पाटील सांगतो, फकीरा भारी जबर माणूस आहे. तो सिंहासारखा दिसतो पण बळ हत्तीचे पाळतो. त्याच्या हातात तलवार तर विजेप्रमाणे खेळते! हे फकिराचे रणझुंजार व्यक्तिमत्व समाजाच्या भल्यासाठी व संघर्षासाठी कधीही सज्ज राहते आणि पेटूनही उठते. एका प्रसंगात फकिरा म्हणतो, "मेलेले मेंढरू आगीला भीत नाही रे, उद्या मरायचे ते आजच मरु या, पण माणसावाणी आणि हिमतीने मरू, शेळी होऊनशान शंभर वर्ष जगण्यापरस वाघ होऊनशान एक दिवस जगाव .... वाघ होऊया नि वाघासारखे जगूया." ही संघर्ष-विद्रोहाची हिम्मत क्रांतिसिंह फकिरामध्येच निर्माण होऊ शकते. म्हणून फकिरा हे क्रांतीचे वादळ आहे. या क्रांती वादळाकडे अण्णाभाऊ म्हटल्या प्रमाणे सहानुभूतीने पहावे लागणार आहे. कारण फकिराने आपला गाव – परिसराकडे, आणि गावगाडयाकडे आपल्या साथीदाराच्या समवेत त्यांच्या परिवाराकडे आणि आपल्या परिवाराकडे आदराने व आपलेपणाने आणि सहानुभूतीने पाहिले आहे त्यातूनचं सामाजिक एकोप्याचे तत्त्वज्ञान साकारले आहे.

अण्णाभाऊंनी सुरुवातीच्या काळातच संपूर्ण मुंबई स्वतःच्या पायाने चाळली. तेथील वाद-विवाद, दंगली, निवेदने, मोर्चे, सभा-संमेलने, संप -

हरताळ आणि वैचारिक लढे अण्णाभाऊंनी पाहिले, अनुभवले त्यात स्वतःचा प्रत्यक्ष सहभागही नोंदविला. त्यातून उपजत कलागुणांच्या, स्वतंत्र प्रतिभेच्या, स्वतंत्र प्रज्ञेच्या, स्वतंत्र विचार सक्त आणि अनुभवाच्या प्रचंड जोरावर अण्णाभाऊंनी त्या कालखंडात तमाशा, लोकनाट्य, शाहिरी, पोवाडे, आणि आणि क्रांती गीते निर्माण केले आणि तो कालखंड 1949 यापूर्वीचा. या संदर्भाने अण्णाभाऊ स्वतः म्हणतात, मी माझ्या कथा लेखनाला 1949 साली सुरुवात केली. त्या अगोदर मी तमाशे, लोकनाट्य आणि शाहीरीचे कार्यक्रम करत होतो. त्याच दरम्यान 1946 साली अण्णाभाऊंनी "देशभक्त घोटाळे" हे लोकनाट्य लिहिले. त्याच लोकनाटयाच्या माध्यमातून जातियवाद, भांडवलदारी, सरंजामदारी आणि जमीनदारी या अन्यायी व्यवस्थेला सुरूंग लावण्यासाठी वैचारिक क्रांती निर्माण केली. तद्वतचं, वर्ण- वर्ग- स्त्रीदास्य च्या विरोधात फकिराने वनवा पेटविला म्हणून फकिराचे बंड व संघर्ष हे रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीबा महात्मा फुले – बाबासाहेब - कार्ल मार्क्स -मॅक्झिम गॉर्की या मानवमुक्तीच्या सत्यशोधकी विचारधारेला अधोरेखित करणारे, दलित बहुजनांच्या उद्धाराचे नि परिवर्तनाचे बंड होते नि आहे. इतकेच नव्हे तर नव्या इतिहासाच्या निर्मितीचे, क्रांतीचे क्रांतिकारत्व होते. या बंड - संघर्षातून वर्ण - वर्ग वर्चस्व आणि स्त्रीदास्य विरोधी विचार व दलित- उपेक्षित- कामगार - बहुजन वर्गावर लादलेल्या अमानुष गुलामीला फकिराने पायदळी तुडविले आणि वैचारिक विचाराच्या नवनिर्मितीतून अपेक्षित असणाऱ्या सत्यशोधकी नि सत्यवर्तनी विचाराच्या नव्या गावाच्या निमार्णाची पेरणी -

रूजवणी - उगवणी अण्णाभाऊला करायची होती म्हणूनच त्यांनी क्रांतीकारक फकिराच्या निमित्त शिवरायाच्या रयतेच्या राज्याची, फुलेंच्या विज्ञान वादाची आणि बाबासाहेबांच्या सामजिक न्यायाची संकल्पना समाजाप्रति कार्यान्वित केली हेच स्पष्ट होते.

फकिराचे एक वैशिष्ट्ये आहे फकिराचे बंड हे कधीच लपून, चोरून, फसवून आणि भित्रेपणाचे नव्हते तर ते विरासारखे, शुरासारखे, आणि क्रांतीकारकासारखे होते. कारण फकिराच्या बंडाची सुरूवात म्हणजेच बंडाची चेतावणी ही शिंग वाजवून आणि हालगीच्या कडकडाटाने जाहीरपणे होत असे. भेडसगावाचाही खजीना फकिराने वाजत – गाजत रघूनाथ ब्राह्मणाच्या बंदुकीला, हात्यारबंद गावकऱ्यांच्या विरोधाला कडाडून लढा देऊन जाहीरपणे लुटला. फकिराच्या शुर आणि निर्भय फौजेनी चढाई केली आणि भेडसगावाचा सरकारी खजिना जाहिरपणे लूटला. दानशूर फकिराने सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून सर्वसामान्यांना वाटला.

दुसरा प्रसंग इंग्रजी अधिकारी जॉन साहेबांनी फकिराला पकडण्यासाठी वाटेगावातील २०० माणसे आणि फकिराच्या घरातील ४ माणसे नेर्ल्याच्या माळावर दावणीला बांधली होती. जॉन साहेबांचा हुकूम होता. फकिरा आणि त्याचे साथीदार जोपर्यंत छावणीवर हजर होणार नाहीत तोपर्यंत त्याचे अटक करून ओलीस ठेवलेली माणसे मूक्त होणार नाहीत. ही इंग्रज शासकाची कृती फकिराच्या सशत्र क्रांतीच्या आणि क्रांतीकारकारच्या समोर सपशेल हार होती म्हणून जॉन साहेबांनी फकिराची माणसे अटक करून

ओलीस ठेवले होते. आपल्या माणसांसाठी व त्यांच्या मुक्तीसाठी फकिराला छावणीवर हाजर होणे क्रम प्राप्त होते म्हणून फकिरा रात्रभर झोपला नव्हता. सकाळी छावणीवर हजर व्हायचं म्हणून फकिराने संपूर्ण तयारी केली होती. पहाटेचं फकिरानी स्नान करून स्वच्छ कपडे अंगावर परिधान करून आष्टीच्या धोतरानी फकिरानी कंबर बांधली होती. फकिरा जेंव्हा छावणीकडे निघाला तेव्हा फकिराला पाठविण्याठी संपूर्ण गावाने डबडबल्या डोळ्यांनी फकिराला शेवटचा निरोप दिला. गावा बाहेर येताचं फकिराने गावाला हात जोडून नमस्कार केला आणि फकिरा छावणीकडे एका क्रांतीकारकाच्या रूबांबात निघाला कारण फकिरा हा क्रांतीकारकचं होता. ज्या प्रमाणे भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू हे हसत हसत निर्भयपणे फासावर चढले अगदी त्याच पध्दतीने फकिरा छावणीला नेल्र्याच्या माळावर पोहचला. छावणीच्या माळावर शिंग वाजली आणि सारी छावणी हादरली. सर्व लोक बाहेर येऊन पाहू लागले. तोच क्रांतीकारक फकिरा जॉन साहेबांच्या तंबूपुढे येऊन गबऱ्यावरून क्रांतीवीरासारखा उतरला आणि आपल्या गाव-परीसरासाठी व माणसासाठी आत्मसर्मपणाची वाट चालून जॉन साहेबांसमोर हजर झाला . हे फकिराचे क्रांतीकारीत्व आजही दमनाच्या विरोधांत सर्वसामान्य माणासांना क्रांतीसाठी प्रेरित करते.

**अण्णाभाऊंच्या जन्मशताब्दीला क्रांतिकारी अभिवादन..!**